(Investment Manager to L&T Mutual Fund)

Date : November 16, 2022
Place: Mumbai

Sd/-
Authorised Signatory

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

financialexp.epapr.in

पश्चिम बंगालमध्ये व्यावसायिक आणि कलात्मक अशा दोन्ही प्रकारच्या चित्रपटांचे प्रवाह अनेक वर्षे सारख्याच ताकदीने वाहत होते. व्यावसायिक चित्रपटांतील संवेदनशील कलावंत म्हणून उत्तम कुमारचा बोलबाला होता तर कलात्मक, बुद्धिवादी चित्रपटांच्या प्रेक्षकांचे लाडके होते सौमित्र चॅटर्जी. सौमित्र चॅटर्जी यांना बंगाली चित्रपटसृष्टीत अपू उर्फ अमल उर्फ फेलुदा म्हणत असत.

प्रतिभावंत बंगाली अभिनेते



सौमित्र चॅटर्जी

सौमित्र यांना नेहमीच कलात्मक प्रदर्शनांचे आकर्षण होते. त्यांनी अभिनयाची सुरुवात कॉलेजच्या काळात नाट्य दिग्दर्शक शिशिर भादुरी यांच्या नाटकातील भूमिकेतून केली होती. रंगमंचावर छोटी छोटी कामे करणारा एक हौशी रेडिओ निवेदक एवढीच ओळख असलेल्या सौमित्र चॅटर्जी यांना सत्यजित राय यांनी अभिनेता केले.

सौमित्र यांनी आकाशवाणीचे उद्घोषक म्हणूनही पूर्णकालीन नोकरी केली होती. पण यासोबतच त्यांनी आपले अभिनयाचे आवडते क्षेत्रही सोडले नाही. सत्यजित राय यांच्या सहवासात ते पडद्यावर वावरण्यापासून तर बोलण्यापर्यंत अनेक बाबतीत घडत गेले आणि एक परिपूर्ण अभिनेता बनले. सत्यजित राय यांच्यानंतर त्यांनी अनेक दिग्दर्शकांकडे, विविध प्रकारच्या भूमिका केल्या आणि त्याही ताकदीच्या होत्या. परंतु राय यांच्या केवळ चित्रपटांचा नव्हे तर चित्रपट विश्वाचा एक अविभाज्य हिस्सा म्हणून सौमित्र चॅटर्जी आणि माधवी मुखर्जी यांनी स्थान मिळवले आहे.

जगात अनेक ठिकाणी एक विशिष्ट दिग्दर्शक आणि एखादा अभिनेता यांची नाळ जुळलेली दिसते. तसेच हे म्हणता येईल. सत्यजित राय यांच्या चौदा चित्रपटांमधून विविध व्यक्तिरेखा चॅटर्जी यांनी साकारल्या होत्या. बंगाली चित्रपटसृष्टीत समांतर चित्रपटांचा आधारस्तंभ म्हणून सौमित्र चॅटर्जीचे नाव घेतले जात असे. कोणत्याही महोत्सवात सौमित्र चॅटर्जी यांच्या भोवती विदेशी पत्रकार अभ्यासक यांचा गराडा असे. सत्यजित राय यांच्या अप्पू चित्रत्रयी मधील तिसरा चित्रपट असलेल्या 'अपूर संसार' मधून सौमित्र चॅटर्जी प्रथम पडद्यावर आले आणि त्यानंतर ते राय यांच्या चित्रपटांचा अपरिहार्य भाग झाले. भारतीय चित्रपटसृष्टीत कलात्मकता, आशय, दृश्यभाषा यांचा आदर्श ठरलेल्या चारूलतामधील 'अमल' ही व्यक्तिरेखा चॅटर्जी यांनाही एक वेगळे व्यक्तिमत्त्व बहाल करून गेली. बंगाली संस्कृती, बंगाली वृत्ती आणि बंगाली कलात्मकता यांचे नेमके मिश्रण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होते आणि सत्यजित राय यांनी त्याचा पूर्ण उपयोग करून घेतला. त्यांच्या नेहमीच्या चित्रपटांतून विविध बंगाली व्यक्तिरेखा राय यांनी त्यांना दिल्याच. फेलुदाच्या कथा सांगतानाही त्यांना सौमित्र चॅटर्जीमध्येच तरुण गुप्तहेरसुद्धा दिसला. सत्यजित राय यांच्या चित्रपटांव्यतिरिक्त त्यांनी मृणाल सेन यांच्या 'आकाश कुसुम'मध्ये केलेली भूमिकाही गाजली होती. तपन सिन्हा यांच्या 'जिन्देर बंदी' या चित्रपटात तर त्यांनी नायक उत्तम कुमार समोर खलनायक साकारला आणि त्याचीही खूप चर्चा झाली. त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कार आणि पद्मभूषणसह अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. तसेच २०१८ मध्ये त्यांना फ्रान्सचा सर्वोच्च नागरी सन्मान लीजन ऑफ ऑनर बहाल करण्यात आला होता. सौमित्र चॅटर्जी यांचे निधन १५ नोव्हेंबर २०२० रोजी झाले.

चेंबूरमधील घाटले ते आळंदी १८ पासून पायी दिंडी सोहळा

■ मुंबई

जगभरातील कोरोना परिस्थितीमुळे उत्सव-सोहळे बंद होते. मात्र आता परिस्थिती निवळल्यामुळे दोन वर्षांनंतर प्रथमच माऊली समाधी सोहळ्यानिमित्त चेंबूरमधील श्री विठ्ठल रखूमाई मंदिर, नागेश पाटील वाडी, घाटले गाव ते आळंदी पायी दिंडी यात्रा शुक्रवार १८ ते २२ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात आली आहे.

गेली २२ वर्षे हा पायी दिंडी सोहळा चेंबूरमधून प्रस्थान करून पाच मंदिरांना भेट देत सलग सात दिवस पायी चालत मंडळाचे संस्थापक अध्यक्ष हभप धोंडीराम चिकणे महाराज यांच्या नेतृत्वाखाली आळंदी येथे दाखल होत आहे. तरी या पायी दिंडी सोहळ्यामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी हभप दिगंबर शेलार (९५९४२४९४९३) आणि हभप दिलीप कदम (९७६९३१४४१७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात येत आहे.

बाळासाहेबांच्या स्मारकाचा पहिला टप्पा मार्च २०२३ पर्यंत पूर्ण होणार

■ मुंबई

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाची पाहणी केली. बाळासाहेबांचे स्मारक जनतेला प्रेरणादायी ठरेल असा विश्वास व्यक्त करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्मारकाचे काम युध्द पातळीवर पूर्ण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे सांगितले. स्मारकाच्या पहिल्या टप्प्याचे काम मार्च २०२३ पर्यंत पूर्ण होणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक लोकांना समर्पित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी मी, उपमुख्यमंत्री व इतर मंत्री पाहणी करायला आलो आहोत. पहिल्या

मुख्यमंत्री शिंदेंची माहिती

टप्प्यात सिव्हिल वर्क ५० टक्केपेक्षा जास्त झाले. दुसर्या टप्प्याच्या आवश्यक बाबींची तयार सुरू आहे. लवकरात लवकर दुसरा टप्पा सुरू होईल. लाखो लोकांना प्रेरणा देणारा हा प्रकल्प आहे. जनतेला समर्पित करण्याचे आमचे काम आहे, असेही शिंदे यांनी सांगितले.

राहुल गांधींची यात्रा राज्यात थांबवा

पान १ वरून

त्याप्रमाणे त्यांनीही राहुल गांधींविरोधात 'जोडे मारो' आंदोलन करावे, असे आवाहनही शेवाळे यांनी केले. दरम्यान, शेवाळे यांच्या या मागणीवर बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकर हे एकमेव असे या देशाचे स्वातंत्र्यसेनानी आहेत ज्यांनी स्वातंत्र्यानंतर व आधी कारावास भोगला. रोज खोटे बोलायचे, निर्लज्जपणे वागायचे हे राहुल गांधी करत आहेत. याला महाराष्ट्राची जनताच उत्तर देईल. ज्या प्रकारे अंदमान कारागृहात अत्याचार स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सहन केला असा एकमेव नेता दाखवा. असे अत्याचार होत असतानाही त्यांच्या मनात स्वातंत्र्यदेवीचे गीत होते. तेच गीत तेथे लिहिले. हे जे काही बोलतात ते कुणीतरी लिहून देतात. राहुल गांधी यांना स्वातंत्र्यवीर सावरकरांमधील 'स' माहीत नाही. त्यांना योग्य प्रकारे उत्तर देऊ. जोपर्यंत सावरकरांना अपमानित करणारे देशात आहेत त्यांना जमिनीत गाडल्याशिवाय शांत बसणार नाही, असा निर्धारही फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. दरम्यान, राहुल गांधी यांच्या नेतृत्वात निघालेली 'भारत जोडो' यात्रा सध्या वाशिम जिल्ह्यात आहे. या यात्रेचा आतापर्यंत जवळपास २७०० किलोमीटरचा प्रवास झाला आहे. या 'भारत जोडो' यात्रेत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार आणि आर.आर. पाटील यांचा मुलगा रोहित पाटील हे देखील सहभागी झाले होते. दोन्ही तरुण नेत्यांनी राहुल गांधींसोबत संवाद साधला. रोहित पाटील यांनी राहुल गांधींना द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने द्राक्ष शेतीवर आलेल्या संकटाची माहिती दिली. राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेला वाशिममध्ये मोठा प्रतिसाद मिळाला. आज रात्री ही यात्रा अकोला जिल्ह्यात दाखल झाली.

ठाकरे कुटुंबाविरोधातील याचिकेवर २२ ला सुनावणी

■ मुंबई

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या बेहिशेबी मालमत्ता प्रकरणावरील याचिकेवर पुढील सुनावणी मंगळवार, २२ नोव्हेंबर रोजी होणार आहे. उद्धव ठाकरे आणि कुटुंबियांच्या बेहिशेबी मालमत्तेची सीबीआय आणि ईडीद्वारे चौकशी करणारी ही याचिका आहे. गौरी भिडे आणि त्यांच्या वडिलांनी मुंबई हायकोर्टात ही याचिका दाखल केली आहे. या याचिकेत प्रबोधन प्रकाश प्रायव्हेट लिमिटेड आणि उद्धव ठाकरे यांच्या उत्पन्नाचे नेमके स्त्रोत काय आहेत? असा प्रश्न याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे. तसेच कोरोना काळात 'सामना' वृत्तपत्राला इतका फायदा कसा झाला? असा देखील प्रश्न याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे. २०२० ते २०२२ या काळात 'सामना' वृत्तपत्राचे टर्नओव्हर ४२ कोटी इतके होते, असाही सवाल उपस्थित करण्यात आला होता.

बुलेट ट्रेन मार्गाला गती देण्याचा पुढील टप्पा सुरू! निविदा मागवल्या

१३५ किलोमीटर लांबीचा प्रकल्प

■ मुंबई

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गाला गती देण्याचा पुढील टप्पा सुरू झाला आहे. १३५ किलोमीटर लांबीच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या कामासाठी नॅशनल हायस्पीड रेल कार्पोरेशन लिमिटेडने निविदा मागवल्या आहेत. व्हायाडक्ट, माउंट बोगदे आणि ३ स्थानकांचा त्यात समावेश आहे. याचबरोबरच ५०८ किमी कॉरिडोरसाठीही निविदा मागवल्या आहेत. १४ मार्च २०२३ ही निविदा भरण्याची अंतिम मुदत आहे. महाराष्ट्रातील कॉरिडोरची एकूण लांबी १५६ किलोमीटर आहे. गुजरातमध्ये ३४८ किलोमीटर आणि दादरा-नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशात ४ किलोमीटर अशा ५०८ किलोमीटर कॉरिडोरसाठी निविदा मागवण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी काम सुरू आहे.

मुंबईबाहेर १३५ किमीचा मार्ग महाराष्ट्र-गुजरात सीमेवर शिळफाटा-झरोली दरम्यान येतो. या भागात ठाणे, विरार आणि बोईसर ही ३ स्थानके बांधली जाणार आहेत. १३५ किलोमीटर कॉरिडोरच्या निविदांमध्ये ३६ पुलांच्या बांधकामांचा समावेश आहे. त्यातील ११ पूल नद्यांवर आहेत. डोंगरात ६ बोगदे आहेत. त्यासाठी निविदा मागवल्या आहेत. १४ मार्च २०२३ पर्यंत निविदा भरण्याची मुदत आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्या उघडण्यात येतील. बुलेट ट्रेनच्या बीकेसीतील भूमिगत स्थानकाच्या बांधकामासाठी २२ जुलै २०२२ रोजी निविदा मागवल्या होत्या. त्याच्या तांत्रिक निविदा ४ नोव्हेंबरला उघडल्या. त्यात अंतिम निविदा ठरवल्या जात आहेत.

...तर समुद्रात जलसमाधी घेणार

बुलढाणा - राज्यात सोयाबीन-कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्या करतोय. सोयाबीन कापसाच्या प्रश्नावर केंद्र व राज्य सरकार गंभीर नाही. त्यामुळे झोपेचे सोंग घेतलेल्या सरकारला जागे करण्यासाठी आता आरपारची लढाई लढायची आहे असे म्हणत हजारो शेतकऱ्यांसह समुद्रात २४ नोव्हेंबर रोजी जलसमाधी घेणार, असा गंभीर इशारा रविकांत तुपकर यांनी दिला आहे.

शुद्धीपत्रक

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये बेस कॉर्पोरेशन लि.च्या परिसमापकांना प्रदान केलेल्या अधिकाराशी संबंधित, दिनांक ०८.११.२०२२ रोजीची ई-लिलाव विक्री सूचना पुढील सूचनेपर्यंत मागे घेण्यात येत आहे.

सही/-
कोंडुरू प्रसांथ राजू
दिनांक: १६.११.२०२२ बेस कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता परिसमापक
ठिकाण: बंगळुरू IBBI/IPA-002/IP-N00708/2018-2019/12200

TENDER NOTICE

Sealed item rate tenders are invited from qualified & reputed contractors who have executed similar work to quote for Repairs, Waterproofing, Plumbing, Painting & Miscellaneous work on behalf of:

VELENTINE APARTMENT-1 C.H.S.L.

Pimpli Pada Gen. A.K. Vaidya Marg, Opp. Jerry Varghese Compound, Malad (East), Mumbai 400 097.
Tender Forms can be collected from Consultant's office from 17/11/22 to 24/11/22 between 10.30 am to 5.00 pm. (Except Holiday)

STERLING CONSORTIUM
An ISO 9001:2015 CERTIFIED CO.
Add: Shop No. 21, Shree Ganesh Ekta Building, Reddy Bldg No. 2, Near Ganesh Mandir, Yashwant Nagar, Goregaon (W), Mumbai – 400 104.
Tel: 83558 68566
Tender Cost: Rs. 5000/- in cash (Non Refundable).

मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
मुख्य कार्यालय : भाईंदर (प.) ता.जि.ठाणे, ४०१ १०१.
वेबसाईटः www.mbmc.gov.in

// मुदतवाढ //

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दि.०१/१०/२०२२ रोजीच्या नवाकाळ, मुंबई ऊर्दू न्युज व धावते नवनगर या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली निविदा सूचना क्र.३० (२०२२-२३) (८४०७३३_१) या कामाकरीता निविदा स्विकारण्याची वेळ दि.१५/११/२०२२ रोजी दुपारी १.०० पर्यंत देण्यात आली होती. सदर कामाकरीता निविदा स्विकारण्याची वेळ वाढवून दि.२८/११/२०२२ रोजी दुपारी १.०० पर्यंत करण्यात येत आहे.

इतर मजकूरात बदल नाही. सही/-
जा.क्र.मनपा/जनसंपर्क/३७४/२०२२-२३ कार्यकारी अभियंता
दि. १६/११/२०२२ पाणीपुरवठा विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त (नियोजन) विभाग
स्वनिधी से समृध्दी कार्यक्रमा अंतर्गत सामाजिक आर्थिक सर्वेक्षण करण्यासाठी स्वारस्याची अभिव्यक्तीव्दारे अर्ज मागविणे.

PM-SVANidhi च्या सर्व लाभार्थ्यांचे सामाजिक - आर्थिक सर्वेक्षण (Profiling) करून, केंद्र शासनाच्या ०८ योजनांच्या (प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जन-धन योजना, इमारत व इतर बांधकाम अंतर्गत नोंदणीकरण, प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना, एक राष्ट्र एक रेशन कार्ड, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना) पात्रतेसाठी फेरीवाले व त्यांच्या कुटुंबियांची पात्रता तपासणे व पात्र लाभार्थ्यांचे आवश्यक कागदपत्र निवड केलेल्या संस्थेद्वारे । कंपनीव्दारे घेऊन लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची । कंपनीची निवड करण्यासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर http://portal.mcgm.gov.in प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर संकेतस्थळावरील About us - Wards/Departments - Department Manuals - Assistant Commissioner Planning - Documents - **''स्वनिधी से समृध्दी कार्यक्रम अंतर्गत सामाजिक आर्थिक सर्वेक्षण''** वर Click केल्यास सदर स्वारस्याच्या अभिव्यक्तीचा पूर्ण प्रस्ताव उपलब्ध आहे.

स्वारस्याच्या अभिव्यक्तीचे प्रस्ताव विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. स्वारस्याच्या अभिव्यक्तीचे प्रस्ताव कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मा. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त हयांनी राखून ठेवला आहे.

उपरोक्त स्वारस्याची अभिव्यक्ती सादर करण्याची अंतिम तारीख दि.२५.११.२०२२ संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत आहे.

सही/-
सहाय्यक आयुक्त (नियोजन)
पीआरओ/१९५५/जाहि./२०२२-२३

शक्यतो घरी केलेले व ताजे अन्न पदार्थ खावे.

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public that our client is negotiating with Mr. Ravi Singhal (Karta) representing Vivek Singhal (HUF) **("Legal Owner")**, the legal and beneficial owner of Office Premises No. 38A admeasuring approx. 715 Sq. Ft. (carpet) and 38B admeasuring approx. 750 Sq. Ft. (carpet) totally admeasuring approx. 1465 sq. ft. square feet (carpet area) on the 3rd Floor of the Society known as Backbay Exports Premises Cooperative Society Limited situated at Jolly Maker Chambers No. II, 225, Nariman Point, Mumbai – 400 021 standing on Plot No. 225, Backbay Reclamation, Nariman Point, Mumbai – 400 025 belonging to the Government of Maharashtra in the Registration District and Sub- District of Bombay bearing Cadastral Survey No. 1929 of Fort Division **("Land")** along with 10 (Ten) paid-up shares bearing nos. 251 to 260 (both inclusive) of the face value of Rs. 50 each issued by Backbay Exports Premises Cooperative Society Limited bearing share certificate No. 141 **("Office Premises")** along with undivided share, right, title, interest in the said Society with respect to the Office Premises, for the sale and transfer of the Office Premises. In this regard, we are investigating the title of the Legal Owner in respect of the Office Premises.

All Persons including an individual, a Hindu undivided family, a company, banks, financial institutions/s, non-banking financial institution/s, a firm, an association of persons or a body of individuals whether incorporated or not, lenders and/or creditors having any claim, right, title, share, and/or interest against the Legal Owner or in respect of legal and beneficial ownership in relation to Office Premises or any part or portion thereof whether by way of exchange, assignment, gift, bequest, lease, sublease, tenancy, sub-tenancy, leave and license, license, covenant, mortgage, encumbrance, lien, charge, trust, inheritance, succession, agreement, contract, memorandum of understanding, easement, right of way, occupation, possession, family arrangement, settlement, maintenance, decree or order of any Court of Law, lis pendens, attachment, reservation, development rights, FSI consumption, TDR, or any liability or commitment or demand of any nature whatsoever or otherwise howsoever, are hereby requested to inform the same in writing along with supporting original documents to the undersigned having their office at **MS. KAVITA PATWARDHAN, CHIMANLAL SHAH & CO., EXAMINER PRESS BUILDING, 35 DALAL STREET, 1ST FLOOR, FORT, MUMBAI – 400001** within a period of 14 (fourteen) days from the date of the publication of this notice, failing which, the claim or claims, if any, of such person or persons shall be considered to have been waived and/or abandoned.
Dated this 17th day of November, 2022
Ms. Kavita Patwardhan, Partner
Chimanlal Shah and Co.

PUBLIC NOTICE FOR LOSS OF SHARE CERTIFICATE

Notice is hereby given that the share certificates no(s) **66886779 for 100 shares bearing distinctive no(s) 6894736832 - 6894736931** standing in the name(s)of **KANTA AGARWAL** in the books of **M/s RELIANCE INDUSTRIES** limited, has/ have been lost/misplaced destroyed and the advertiser has/have applied to the company for issue of duplicate share certificate(s) in lieu thereof, any person(s) who has/have claims) on the said shares should lodge such claims) with the company's registrars and transfer agents viz KfinTechnologies Private Limited, Selenium Tower B, Plot no: 31 &32 Gachibowli, Financial District, Nanakramguda, Hyderabad - 500032 within 15 days from the date of this notice falling which the company will proceed to issue duplicate share certificate(s) in respect of the said shares.
Date: 17th Nov 2022 Name(s) of the Shareholder(s)
Place: Mumbai **KANTA AGARWAL**

स्मरणपत्र-१

संस्थेच्या सर्व सभासदांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० साली केलेले नियम १९६१ मध्ये सहकार विभागाकडून घटना दुरुस्ती सन २०१३ साली झालेली असून त्यामध्ये सभासद भागाची दर्शनी किंमत ही पूर्वी रुपये १०/- होती. ती घटना दुरुस्तीमध्ये दर्शनी भागाची किंमत रुपये १००/- इतकी केली असून सदर रक्कम नोटीस जाहीर तारखेपासून ६० दिवसांच्या आत सर्व सभासदांनी आपल्या दर्शनी भागाची किंमत ही संस्थेकडे भरणा लेखाशाखेकडे करावी. ज्या सभासदांनी आपली भागाची निर्धारित दर्शनी किंमत संस्थेकडे वेळेत भरणा केली नाही. तर मागील रक्कम अनामत खाती वर्ग करण्यात येईल. तसेच सर्व सभासदांना आपले सभासदत्व अबाधित करण्याच्या उद्देशाने सुचित करण्यात येते की, आपल्या हयातीबाबतचे व क्रियाशिलतेबाबतची नोंद संस्थेच्या नोंदणीकृत पत्त्यावर करण्यात यावी. विहीत कालावधीत नोंद न केल्यास सभासदत्व रद्द झाल्यास संस्था जबाबदार राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी व संस्थेला सहकार्य करावे.
दिनांक : १७/११/२०२२
ठिकाण : मुंबई
आपले नम्र,
लो. टी. म. स. आणि रु. ग्रा. सह. संस्था मर्या.
संचालक मंडळाच्या आदेशावरून

मर्कॉटॉर लिमिटेड

MERCATOR
सीआयएन: L63090MH1983PLC031418
नोंद. कार्यालय: ८३-८७, ८ वा मजला, मित्तल टॉवर, बी-विंग, नरिमन पॉईंट, मुंबई, महाराष्ट्र-४०००२१.
ईमेल : secretarial@mercator.co.in, वेबसाईटः www.mercator.co.in
दूर.: +९१ २२ ६६३७ ३३३३; फॅक्स: +९१ २२ ६६३७ ४४४४

३८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई-मतदान माहिती

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, कॉर्पोरेट कामकाज मंत्रालयाद्वारे पारित केलेल्या सर्वसाधारण परिपत्रके दिनांक ५ मे, २०२२ आणि संबंधित परिपत्रके ("एमसीए परिपत्रके") आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया यांच्याद्वारे पारित संबंधित परिपत्रकांसह ("सेबी परिपत्रके") वाचावयाच्या कंपनी कायदा, २०१३ ("कायदा") च्या लागू तरतुदी आणि त्यांअंतर्गत बनविलेल्या नियमांच्या अनुपालनामध्ये, दि. १४ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या एजीएमच्या सूचनेमध्ये निश्चित केलेले कामकाज करण्याकरिता **मर्कॉटॉर लिमिटेड** ("कंपनी")च्या सदस्यांची ३८ वी (अडतिसावी) वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") **बुधवार, दि. ०७ डिसेंबर, २०२२ रोजी स. ११.३० (भा.प्र.वे.)** वाजता व्हिडियो कॉन्फरन्सिंग ("व्हीसी")/इतर दृक श्राव्य माध्यमे ("ओएव्हीएम") द्वारे घेण्यात येणार आहे.

एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रकांच्या अनुपालनामध्ये, वित्तीय वर्ष २०२१-२२ करिता वार्षिक अहवालासोबत सूचनेच्या इलेक्ट्रॉनिक प्रती सर्व सदस्यांना, ज्यांचे ई-मेल आयडी कंपनी / निबंधक आणि हस्तांतरण एजन्ट ('आरटीए') किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट(स) यांच्याकडे **शुक्रवार, दि. ०४ नोव्हेंबर, २०२२** रोजी नोंदणीकृत आहेत, ई-मेलद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आल्या आहेत. त्याची प्रत कंपनीची वेबसाईट म्हणजेच www.mercator.co.in आणि सीडीएसएलची वेबसाईट www.evotingindia.com वर उपलब्ध आहे. एजीएमच्या सूचनेची ईमेल द्वारे पाठवणी **बुधवार, १६ नोव्हेंबर, २०२२** रोजी पूर्ण झाली आहे.

कायद्याच्या कलम ९१ च्या तरतुदींनुसार, ३८ व्या एजीएमच्या कारणास्तव कंपनीच्या सदस्यांचे नोंदपट आणि भाग हस्तांतरण पुस्तिका **गुरुवार, दि. ०१ डिसेंबर, २०२२ ते बुधवार, ०७ डिसेंबर, २०२२ (दोन्ही दिवस समाविष्ट)** पर्यंत बंद राहतील.

जे सदस्य **बुधवार, ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी म्हणजेच कट-ऑफ दिनांकानुसार** भौतिक स्वरुपात अथवा डिमटेरिअलाईज्ड स्वरुपात समभाग धारण करीत असतील, ते एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या व्यवसायावर सीडीएसएलच्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ('रिमोट ई-मतदान') त्यांचे मत देऊ शकतील. कोणीही व्यक्ती, जो कट-ऑफ दिनांकानुसार कंपनीचा सदस्य असेल फक्त तोच एजीएममध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर त्याचे/तिचे मत देण्यात पात्र असेल.

डिमटेरिअलाईज्ड स्वरुपात, भौतिक पद्धतीने भाग धारणा करणारे सदस्य आणि ज्या सदस्यांनी त्यांचे ईमेल आयडी नोंदणीकृत केलेले नाहीत, अशा सदस्यांकरिता दूरस्थ मतदानाची पद्धत एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आलेली आहे. तपशील कंपनीच्या वेबसाईट www.mercator.co.in वर उपलब्ध असतील.

सर्व सदस्यांना याद्वारे सूचित करण्यात येते की:

१. एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या व्यवसायाचे कामकाज दूरस्थ ई-मतदान किंवा एजीएममधील ई-मतदान यंत्रणेद्वारे करण्यात येईल.
२. दूरस्थ ई-मतदान किंवा एजीएममध्ये ई-मतदान यंत्रणेद्वारे मतदानाची पात्रता निश्चित करण्याकरिता कट-ऑफ दिनांक **बुधवार, दि. ३० नोव्हेंबर, २०२२ आहे;**
३. कट-ऑफ दिनांकानुसार अद्ययावत असलेल्या सदस्यांचे नोंदपट किंवा लाभार्थी मालकांच्या नोंदपटामध्ये ज्या व्यक्तींची नावे नोंद आहेत, फक्त त्याच व्यक्ती ई-मतदान सुविधा तसेच एजीएममध्ये ई-मतदान यंत्रणेचा वापर करण्यास पात्र असतील;
४. रिमोट ई-मतदान **रविवार, दि. ०४ डिसेंबर, २०२२ (स. ९.०० आधारे)** रोजी सुरु होईल **आणि मंगळवार, दि. ०६ डिसेंबर, २०२२ (सायं. ५.०० आधारे) रोजी बंद होईल;**
५. रिमोट ई-मतदान यंत्रणा त्यानंतर सीडीएसएलद्वारे अक्षम करण्यात येईल;
६. कोणी व्यक्ती ज्याने कट-ऑफ दिनांकास, म्हणजेच **बुधवार, ३० नोव्हेंबर, २०२२** रोजी कंपनीचे समभाग संपादित केले आहेत आणि कंपनीचा सदस्य झाला आहे तो त्याचे मत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने देण्याकरिता helpdesk.evoting@cdslindia.com येथे विनंती पाठवून लॉगईन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकतील. तथापि, जर व्यक्ती ई-मतदानाकरिता सीडीएसएलकडे आधीपासूनच नोंदणीकृत असल्यास त्यांचे मत देण्याकरिता विद्यमान युजर आयडी आणि पासवर्डचा वापर करू शकतील;
७. ज्या सदस्यांनी सभेपूर्वी ई-मतदानाद्वारे त्यांचे मत दिलेले असेल, ते सभेस उपस्थित राहू शकतील परंतु पुन्हा त्यांचे मत देण्यास ते पात्र नसतील.

रिमोट ई-मतदान प्रक्रिया आणि एजीएममधील ई-मतदान सुविधा निष्पक्ष आणि पारदर्शक रितीने छाननी करण्याकरिता मे. मनिष घिया ॲण्ड असोसिएट्स, कंपनी सेक्रेटरीज, मुंबई यांची स्क्रुटिनायझर म्हणून नियुक्ती केली आहे. विहीत कालावधीमध्ये स्क्रुटिनायझरच्या अहवालासह घोषित निकाल कंपनीच्या वेबसाईटवर प्रदर्शित करण्यात येतील आणि तसेच स्टॉक एक्सचेंजला देखील कळविण्यात येतील

रिमोट ई-मतदान आणि एजीएममधील ई-मतदान सुविधेच्या तपशीलवार सुचनांकरिता, सदस्यांनी ३८ व्या एजीएमच्या सूचनेमधील 'ई-मतदान प्रक्रिया' विभागाचा संदर्भ घ्यावा. ई-मतदान प्रक्रियेशी संबंधित शंका किंवा तक्रारी असल्यास, सदस्यांनी www.evotingindia.com येथे हेल्प सेक्शनअंतर्गत उपलब्ध नियमित विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि ई-मतदान मॅन्यूअलचा संदर्भ घ्यावा किंवा श्री. राकेश दळवी, व्यवस्थापक (सीडीएसएल) सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्युच्युरेक्स, मफतलाल मिल कंपाऊंड्स, ना म जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई-४०००१३ येथे लेखी कळवावे किंवा helpdesk.evoting@cdslindia.com येथे ईमेल पाठवावा किंवा ०२२-२३०५८५४२/४३ येथे संपर्क साधावा.

मर्कॉटॉर लिमिटेडकरिता
सही/-
ठिकाणः मुंबई मंगेश मुकुंद देवकर भोसले
दिनांकः १६ नोव्हेंबर, २०२२ मुख्य वित्तीय अधिकारी आणि अनुपालन अधिकारी

(मर्कॉटॉर लिमिटेड सध्या नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ ('आयबीसी") च्या तरतुदी आणि त्यांअंतर्गत बनलेल्या विनियमांच्या दृष्टीने मान. राष्ट्रीय कंपनी कायदे न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठाच्या दि. ०८ फेब्रुवारी, २०२१ च्या आदेशानुसार कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रियेमध्ये आहे. सदर आदेश आणि आयबीसीच्या तरतुदींनुसार संचालक मंडळाचे अधिकार निलंबित करण्यात आले आहेत आणि ते अधिकार ठराव व्यावसायिकाच्या क्षमतेमध्ये श्री. गिरीश सिरिराम जुनेजा यांना देण्यात आले आहेत.)

अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.अंनप/ बांधकाम विभाग/२०२२-२३/६९१ दि. १५ नोव्हेंबर, २०२२

ई- निविदा सूचना क्र. सन २०२२-२३

मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, इच्छुक, अनुभवी, अर्हता प्राप्त कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता बी-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

अ. क्र.	कामाचे नांव	निविदेची अंदाजित किंमत (₹)	कंत्राटदाराचा वर्ग
०१	वैशिष्ट्यपुर्ण अनुदानाअंतर्गत अंबरनाथ पूर्वेकडील आरक्षण क्र. १४९ या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचा तरण तलाव बांधणे.	११,०५,३६,०१७/- (वस्तू व सेवा कर वगळून)	इच्छुक, अनुभव व अर्हता प्राप्त कंत्राटदार

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दि. १७/११/२०२२ दुपारी १२.०० ते दि.१२/१२/२०२२ दु. ३.०० पर्यंत
निविदा पुर्व बैठक :- दि. ३०/११/२०२२ वेळ :- दुपारी १२.०० वाजता
बैठकीचे ठिकाण :- मुख्याधिकारी यांचे सभागृह, अं.न.प. अंबरनाथ
ई- निविदा उघडणे :- दि. १३/१२/२०२२ दु. ३.०० वा.

खालील सकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
२. मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद यांचे कार्यालयातील सूचना फलक

सही/-
(डॉ. प्रशांत रसाळ)
प्रशासक,
अंबरनाथ नगरपरिषद

कार्यालय : टिळक पथ, के. बी. रोड, अंबरनाथ (प.), ता. अंबरनाथ, जि. ठाणे. पिनकोड ४२१५०१
Website www.ambarnathcouncil.net
E-Mail chiefofficerambarnath@gmail.com / ambarnathcouncil@gmail.com
Phone No. 0251-2682353/18002331106